(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XV / Issue – I ISSN 2277-8063

# दुर्ग पर्यटन : महाराष्ट्रातील किल्ल्यांचे पर्यटनदृष्ट्या महत्त्व

**संदिप विष्णू मोहिते**, सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, ता.कागल

---

**सारांश**

महाराष्ट्राला किल्ल्यांची समृद्ध परंपरा लाभली आहे. विशेषतः छ.शिवाजी महाराज यांच्या काळात किल्ल्यांचे महत्त्व राजकीय, लष्करी आणि प्रशासकीय दृष्टीने अत्यंत मोठे होते. आज हे किल्ले ऐतिहासिक वारसा म्हणून ओळखले जातात आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहेत. दुर्ग पर्यटनामुळे इतिहासाची माहिती लोकांपर्यंत पोहोचते तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. महाराष्ट्रातील अनेक किल्ले जसे की राजगड, रायगड, सिंधुदुर्ग, प्रतापगड हे गड पर्यटकांसाठी प्रमुख आकर्षण केंद्र आहेत. या संशोधन पेपरमध्ये दुर्ग पर्यटनाचे महत्त्व, त्यातील संधी, अडचणी आणि विकासासाठी उपाय यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**1. प्रस्तावना**

महाराष्ट्राचा इतिहास किल्ल्यांशिवाय अपूर्ण आहे. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये असलेले अनेक किल्ले मराठा साम्राज्याच्या सामर्थ्याचे प्रतीक आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या आधारे स्वराज्याची स्थापना केली आणि त्यांचे सुयोग्य व्यवस्थापन केले.

आजच्या काळात हे किल्ले ऐतिहासिक पर्यटन स्थळे बनली आहेत. देश-विदेशातील पर्यटक महाराष्ट्रातील किल्ले पाहण्यासाठी येतात. त्यामुळे दुर्ग पर्यटन हे पर्यटन उद्योगातील एक महत्त्वाचे क्षेत्र बनले आहे. दुर्ग पर्यटनामुळे इतिहासाची जपणूक होते तसेच स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

**2. दुर्ग पर्यटनाची संकल्पना**

दुर्ग पर्यटन म्हणजे ऐतिहासिक किल्ले, गड आणि त्यांच्याशी संबंधित ऐतिहासिक स्थळांचा पर्यटनासाठी उपयोग करणे. किल्ल्यांची रचना, वास्तुकला, इतिहास आणि परिसर यांचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक या ठिकाणी भेट देतात.

महाराष्ट्रात सुमारे 350 पेक्षा अधिक किल्ले आहेत. त्यापैकी काही किल्ले डोंगरावर, काही समुद्रकिनारी आणि काही सपाट प्रदेशात बांधलेले आहेत. प्रत्येक किल्ल्याची बांधणी आणि वैशिष्ट्य वेगळी आहे. त्यामुळे दुर्ग पर्यटन पर्यटकांसाठी विशेष आकर्षण निर्माण करते.

**3. दुर्ग पर्यटनाचे उद्दिष्टे**

या संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

1. महाराष्ट्रातील दुर्ग पर्यटनाचे महत्त्व समजून घेणे.
2. किल्ल्यांच्या पर्यटन विकासातील संधींचा अभ्यास करणे.
3. दुर्ग पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
4. किल्ल्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक उपाय सुचवणे.

**4. संशोधन पद्धती**

या संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. विविध पुस्तके, संशोधन लेख, पर्यटन विभागाची संकेतस्थळे आणि ऐतिहासिक संदर्भ यांचा अभ्यास करून माहिती गोळा करण्यात आली आहे.

तसेच महाराष्ट्रातील प्रमुख किल्ल्यांबाबत उपलब्ध माहितीचे विश्लेषण करून दुर्ग पर्यटनाचे महत्त्व आणि त्याच्या विकासाच्या संधी यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**5. महाराष्ट्रातील प्रमुख दुर्ग पर्यटन स्थळे**

महाराष्ट्रात अनेक ऐतिहासिक किल्ले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे किल्ले पुढीलप्रमाणे आहेत –

**5.1. राजगड -** राजगड हा दुर्ग मराठा साम्राज्याची पहिली राजधानी होता. पदमावती,सुवेळा आणि संजीवनी माची या तीन माच्यासह बुलंद आणि बेलाग असा बालेकिल्ला या गडाला आहे.

**5.2. रायगड -** स्वराज्याची दुसरी राजधानी असलेला हा गड छ.शिवाजी महाराजांचा राजाभिषेकाचा अतिशय देखणा सोहळा या गडावर पार पडला. आजही इतिहास प्रेमींच्या अगदी पसंतीचा हा गड आहे.

**5.3. सिंहगड -** तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाची साक्ष देत आजही हा गड अगदी दिमाखात उभा आहे.

**5.4. प्रतापगड** – जवळीच्या जंगलातील अगदी बेलाग असा हा गड पर्यटकांना भुरळ घालतो, छ. शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध या गडाच्या पायथ्याशी केला त्यामुळे ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय महत्वाचा हा गड आहे.

**5.5. सिंधुदुर्ग** – समुद्रात बांधलेला भव्य गड महाराजांच्या दूरदृष्टीची साक्ष देत आणि समुद्राच्या लाटांना टकरा देत आजही दिमाखात उभा आहे. चारही बाजूंनी समुद्राचे खारे पाणी आणि गडात मात्र गोडे पाणी हा निसर्गाचा चमत्कार आपल्याला इथे पाहायला मिळतो.

**याशिवाय हरीहर, कलावंतीण, हरिश्चंद्रगड, कोल्हापूर मधील पन्हाळा हे गड सुद्धा पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय लोकप्रिय आणि महत्वाचे आहेत**.

हे किल्ले केवळ ऐतिहासिक नाहीत तर पर्यटनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे आहेत.

**6. दुर्ग पर्यटनाचे महत्त्व**

**6.1. ऐतिहासिक वारसा जतन**

किल्ले हे महाराष्ट्राच्या आणि प्रामुख्याने छ.शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाचे प्रतीक आहेत. दुर्ग पर्यटनामुळे हा वारसा जतन करण्यास मदत होते.

**6.2. पर्यटन वाढ**

किल्ल्यांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या मध्ये आणि इतिहास प्रेमींच्या मध्ये खूप वध झाली आहे. त्यामुळे राज्यातील पर्यटन उद्योगाला चालना मिळते.

**6.3. स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना**

पर्यटकांमुळे एकूणच वाहतूक व्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळते तसेच स्थानिक लोकांना सुद्धा हॉटेल, वाहतूक, मार्गदर्शक सेवा यांसारख्या व्यवसायातून रोजगार मिळतो.

**6.4. सांस्कृतिक जतन**

किल्ल्यांशी संबंधित इतिहास, परंपरा, सण आणि ऐतिहासिक कथा जिवंत राहण्यासाठी आणि त्याचा प्रसार होण्यासाठी मदत होते.

**7. दुर्ग पर्यटनातील अडचणी**

दुर्ग पर्यटनाचा विकास करताना काही समस्या दिसून येतात –

**7.1. किल्ल्यांची अपुरी देखभाल -** शिवकाळात जसे किल्ले होते तसे आपल्याला आता बघायला मिळत नाहीत कारण आता या सर्व किल्ल्यांची पुरेशी देखभाल होत नाही.

**7.2. पर्यटकांकडून कचरा टाकणे -** गडावर अनेक पर्यटक फिरायला येतात त्यांच्या माध्यमातून सुद्धा गडावर खूप मोठ्या प्रमाणात कचरा होत असतो त्यामुळे गडाचे पावित्र्य तर धोक्यात येतच यासोबतच अस्वच्छता आणि प्रदूषण पण हिते.

**7.3. पायाभूत सुविधांचा अभाव -** शासनाच्या माध्यमातून पर्यटनासाठी वाहतूक, पार्किंग, राहण्याची सुविधा तसेच मार्गदर्शन सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत.

**7.4. योग्य माहिती केंद्रांची कमतरता -** आपण दुर्गपर्यटन का करतोय याची नेमकी माहिती अनेकांना असतं नाही. लोक फक्त सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गडावर जात असतात त्यांना आपल्या इतिहासाची माहिती व्हावी यासाठी त्यांना त्याप्रकारची माहिती उपलब्ध करून दिली पाहिजे.

**8. दुर्ग पर्यटन विकासासाठी उपाय**

**8.1. किल्ल्यांचे संवर्धन आणि दुरुस्ती करणे. -** शासनाने गडांची जी पडझंड होत आहे त्याची योग्य वेळी डागडुजी करणे आवश्यक आहे जेणेकरून आपला ऐतिहासिक वारसा जतन करणे शक्य होईल.

**8.2. पर्यटनासाठी रस्ते, पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करणे.-** रस्ते, पार्किंग साठी जागा, पाणी आणि गडावर तसेच गडाच्या परिसरात स्वछतेच्या सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.

**8.3. पर्यटकांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षित गाईड उपलब्ध करणे.-** गडावर येणाऱ्या पर्यटकांसाठी गडाची भौगोलिक माहिती तसेच ऐतिहासिक माहिती व्हावी यासाठी तज्ञ, प्रशिक्षित मार्गदर्शक म्हणजेच गाईड उपलब्ध करून दिले पाहिजेत. म्हणजे लोकांना गडांच्या माहितीसोबतच काही लोकांना रोजगारही मिळेल.

**8.4. किल्ल्यांवर स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे-**

हल्ली गडावर जाणारे पर्यटक मोठ्या प्रमाणात हुल्लडबाजी करताना दिसतात, तसेच काहीजण सोशल मीडियाच्या नादात धोकादायक कड्यावर आपले फोटो/सेल्फी घेत असतात. त्यामुळे अनेकजण कड्यावरून पडून मृत्यू होणे किंवा अपंग होणे असे प्रकार होत आहेत यासाठी धोकादायक ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था असायला पाहिजे.

**निष्कर्ष**

दुर्ग पर्यटन हे महाराष्ट्राच्या इतिहास आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य नियोजन आणि व्यवस्थापन केल्यास दुर्ग पर्यटनामुळे पर्यटन उद्योगाचा विकास होऊ शकतो तसेच स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे किल्ल्यांचे संवर्धन आणि संरक्षण करणे ही आजच्या काळाची गरज आहे.

**संदर्भ**

1. राजा शिवछत्रपती
2. Shivaji and His Times
3. Maharashtra Tourism Development Corporation अधिकृत संकेतस्थळ
4. महाराष्ट्र राज्य पर्यटन विभागाचे प्रकाशन
5. महाराष्ट्रातील गडकिल्ले - डॉ.द.ग.देशपांडे